ST JOHN'S PUBLIC SCHOOL CBSE,NAGPUR

SECOND TERM EXAMINATION (2019—20)

Name : _____	Subject: Marathi	Max. Mks : 50
Roll No. :_____	Class : VI	Time : 3Hrs
Date _____	Session : 2019- 20	No. Of Ques. : 0 7

सामान्य निर्देश :

क) प्रश्नपत्राला चार भागात वेगवेगळे केले आहे.

ख) सर्व प्रश्न आवश्यक आहेत. प्रश्न क्रमांक अचूक आणि स्पष्ट लिहावा.

ग) उत्तर स्पष्ट आणि सुंदर अक्षरात लिहावे.

घ) प्रश्न पत्र लक्षपूर्वक वाचावे.

खंड क

प्रश्न 1) अपठीत गद्य उतारा वाचा आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (1x5=5)

अलिबाग हे शहर महाराष्ट्रातील कोकणपट्टीवर आहे. हे शहर सतराव्या शतकात मराठा साम्राज्याचे सेनापती सरखेल कान्होजी आंग्रे यांनी वसवले. हे शहर रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यावरील शहर आहे. रायगड जिल्ह्याचे पूर्वीचे नाव कुलाबा जिल्हा असे होते. किहीम , आवास, रेवदंडा , चौल, नागाव, अक्षी, वरसोली, थळ ही समुद्रकिनारे असलेली पर्यटनस्थळे अलिबागच्या आजूबाजूला वसलेली आहेत.'अलिबाग ' हे नाव या भागाला कसे पडले याची एक कथा आहे. शेकडो वर्षापूर्वीयुरोपमधून काही लोक बोटीने स्थलांतरित झाले आणि ते कुलब्याच्या किनाऱ्यावर लागले. ते लोक तिथेच राहू लागले आणि तेथील मातीच्या समाजजीवनात मिसळून गेले. त्यांच्यापैकीच एक अली नावाचा श्रीमंत माणूस त्याची तेथे भरपूर जमीन होती. त्यावर त्याने आंब्याच्या आणि नारळीच्या बागा लावल्या होत्या. स्थानिक लोक त्या जागेला ' अलीची बाग ' म्हणत. साध्यासोप्या भाषेत अलिबाग म्हणत. तेच नाव या गावाला लागले.

प्रश्न १) अलिबाग हे शहर कुठे वसले आहे?

प्रश्न २) रायगड जिल्ह्याचे पूर्वीचे नाव काय होते?

प्रश्न ३) अलिबागच्या आजूबाजूला वसलेली पर्यटनस्थळे कोणती?

प्रश्न ४) अलिबागला स्थानिक लोक काय म्हणत?

प्रश्न ५) अलिबाग हे शहर कोणी वसवले?

खंड ख

प्रश्न 2) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. (1x5=5m)

(परगावी,चित्रपटसृष्टीचे,कीर्तनकार ,बैल, प्रतिभा)

१) चाऱ्या बिगर माझा एक ---------- मेला.

२) रामचे वडील प्रसिद्ध ---------- होते.

३) मुंबई भारतीय ---------- जन्मस्थान आहे.

४) प्रत्येकाजवळ कुठली तरी ---------- असते.

५) मी बहुतेक -------- जात असतो.

प्रश्न 3) चूक की बरोबर ते लिहा. **(1x3=3m)**

१) नागपूर हे शेवळकरांचे मूळ गाव. २) 'असोशी' हा त्यांचा काव्यसंग्रह आहे..

३) त्यांनी नागपूरला दोन वर्ष वास्तव्य केले.

प्रश्न 4) कोण कोणास म्हणाले ते लिहा. **(1x3=3m)**

१) " मला क्षमा करावी महाराज." २) "धावा, पकडा. चोर चोर!"

३) " नाव काय तुझं?"

प्रश्न 5) एका वाक्यात उत्तरे लिहा.(any4) **(1x4=4m)**

१) चोराचे नाव काय होते?

२) लेखक दगडावर बसून काय पाहू लागले?

३) राम किती वर्षाचे असताना त्याची आई वारली ?

४) मुलाचे हात कोणाला लागणार आहे?

५) बसवेश्वर कोणत्या राज्याचे महामंत्री होते?

खंड ग

प्रश्न 6) खाली दर्शविल्याप्रमाणे उत्तरे लिहा. **(25m)**

प्रश्न१) समानार्थी शब्द लिहा. १) सैनिक २) पाहुणे

प्रश्न२) विरुद्धार्थी शब्द लिहा. १) संध्याकाळ २) उठणे

प्रश्न३) भाववाचक नामे तयार करा. १) धूर्त २) गुलाम

प्रश्न४) लिंग बदला. १) वृद्ध २) डॉक्टर

प्रश्न५) वचन बदला. १) वाट २) माणूस

प्रश्न ६) खालील वाक्यांतील आज्ञार्थक क्रियापद ओळखा.

१) जा दार उघडा.

२) पाहुण्यांना घरी पाठवून द्या.

प्रश्न ७) शब्दांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (Any 1)

१) निर्धार करणे २) आभाळ ठेंगणे वाटणे

प्रश्न८) खालील वाक्यातील काळ ओळखा .

१) मराठी विषयाचे प्राध्यापक झाले. २) संध्याकाळी अभ्यास करीत असत.

प्रश्न ९) खालील वाक्ये शुद्ध करून पुन्हा लिहा.

१) गेलया ३१ डीसेम्बरचि गोरट.

२) चलता चलता मि सटेबनवर गेलो.

प्रश्न १०) शब्दांचा योग्य क्रम लावून अर्थपूर्ण वाक्य बनवा.

१) माझा आहे क्रम असा वर्षाचा काही .

२) सुचिन्हे लागली दिसू सर्व प्रकारची.

प्रश्न ११) केवल प्रयोगी अव्यायाचा उपयोग करून वाक्य तयार करा.(Any 1)

१) अहाहा! २) अरे !

प्रश्न १२) कंसात दिल्याप्रमाणे वाक्य परिवर्तन करा.

1) साहेबांना जेवायला तरी वाढ.(प्रश्नार्थी वाक्य)

2) ते तू खोटे ठरव .(नकारार्थी वाक्य)

प्रश्न १३) वाक्यात उपयोग करा. (Any 2)

१) झेप घेणे २) पांग फेडणे ३) हातावर तुरी देणे

खंड घ

प्रश्न 7) खालील चित्र पहा. त्याचे वर्णन आपल्या शब्दांत करा. (05)